# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १०१ वा ❑ भारतीय सौर दिनांक ०९ ज्येष्ठ शके १९४८, शनिवार दि.३० मे २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### एकाच बातमीचा अतिरेकी मारा आणि जातीय तेढ

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

कोणत्याही एकाच बातमीचा २४ तास सतत मारा झाल्यामुळे प्रेक्षकांच्या मानसिक आरोग्यावर आणि माहितीच्या अधिकारावर निश्चितच वाईट परिणाम होतो. टीव्ही चॅनेलवर दिवसभर एकच बातमी सतत दाखवणे ही प्रेक्षकांसाठी नक्कीच अत्यंत चिंताजनक आणि कंटाळवाणी बाब आहे. यामुळे प्रेक्षकांची ऊर्जा वाया जाते आणि महत्त्वाची माहिती मिळण्याऐवजी मानसिक थकवा जाणवतो.

या प्रवृत्तीमुळे मानसिक तणाव निर्माण होण्याचा धोका वाढतो.दिवसभर नकारात्मक किंवा एकाच प्रकारची बातमी पाहिल्याने मनात भीती, चिंता आणि नैराश्य वाढू शकते.

नकारात्मक बातम्या वारंवार वाचल्याने शरीरात कोर्टिसोल आणि एड्रेनालाईन या ताणतणाव निर्माण करणाऱ्या हार्मोन्सची पातळी वाढते. भविष्याबद्दल सतत भीती वाटणे आणि नेहमी वाईट घडेल अशी नकारात्मक विचारसरणी तयार होते.रात्रीच्या वेळी मोबाईलवर अशा बातम्या पाहिल्याने झोपेचे चक्र बिघडते आणि निद्रानाशाची समस्या उद्भवते.मानसिक ताणामुळे दिवसभर थकवा जाणवणे, स्नायू आखडणे आणि डोकेदुखीचा त्रास होणे. एकाग्रतेचा अभाव जाणवतो. सततच्या चिंतेमुळे दैनंदिन कामात लक्ष केंद्रित करणे कठीण जाते.

२४ तास एकच बातमी चालल्यामुळे देशातील किंवा जगातील इतर महत्त्वाच्या घडामोडी लोकांपर्यंत पोहोचत नाहीत. दिवसभरात घडणाऱ्या इतर महत्त्वाच्या राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय किंवा स्थानिक घडामोडी लोकांपर्यंत पोहोचत नाहीत.

पुरेशा माहितीअभावी किंवा टीआरपीच्या नादात अनेकदा एकाच बातमीमध्ये अतिरंजकता, अफवा किंवा चुकीची माहिती मिसळली जाण्याची शक्यता असते. सतत एकच दृष्टिकोन किंवा विचार लोकांवर बिंबवल्यामुळे समाजात मतभेद आणि पूर्वग्रहदूषित विचारसरणी वाढीस लागतात.

एकाच बातमीचे वारंवार वार्तांकन केल्याने अनेकदा तिचे चुकीचे चित्रण केले जाते किंवा ती अतिरंजित केली जाते, ज्यामुळे समाजात जातीयवाद आणि द्वेष यांसारख्या समस्या निर्माण होतात.

एकाच बातमीचा किंवा घटनेचा अतिरेकी मारा (मीडिया ट्रायल आणि एकतर्फी माहितीचा भडिमार) मानवी मानसिकतेवर खोलवर परिणाम करतो आणि त्यातून समाजात जातीय किंवा धार्मिक तेढ निर्माण होण्याचा मोठा धोका असतो.डिजिटल माध्यमांच्या काळात अशा बातम्यांचे स्क्रीनशॉट, व्हिडिओ आणि खोट्या माहितीचा महापूर येतो, जो जातीय तेढ भडकवण्याचे काम करतो.

एकाच बातमीचा किंवा घटनेचा अतिरेकी मारा हा जनमानसात पूर्वग्रह आणि जातीय तेढ निर्माण करण्यासाठी अत्यंत घातक ठरतो. जेव्हा विशिष्ट प्रकारची माहिती किंवा संवेदशील बातमी सतत आणि वारंवार लोकांपर्यंत पोहोचवली जाते, तेव्हा मानवी मानसशास्त्रावर व समाजावर त्याचे गंभीर परिणाम होतात

पत्रकारितेच्या दर्जात होणारी घसरण होतेवस्तुनिष्ठ आणि शोध पत्रकारितेची जागा गोंधळ, आरडाओरडा आणि पक्षपाती वादविवादांनी घेतली आहे.

प्रेक्षकांचा बहुमूल्य वेळ वाया जातो आणि त्यांना कोणतीही नवी माहिती मिळत नाही.पत्रकारितेच्या दर्जावर प्रश्नचिन्ह: टीआरपी आणि व्यावसायिक फायद्यासाठी चॅनेल अशा प्रकारे बातम्यांचे वारंवार टीकाकरण करतात, जे दर्जेदार पत्रकारितेच्या नियमांच्या विरुद्ध आहे.

सतत नकारात्मक बातम्यांच्या माऱ्यामुळे लोकांमध्ये, विशेषतः महिला आणि बालकांच्या मनात सुरक्षिततेबद्दल भीती निर्माण होते. विशिष्ट घटनेला किंवा समुदायाला लक्ष्य करून सातत्याने वार्तांकन केल्यास समाजात आम्ही विरुद्ध ते अशी दुफळी माजते. राजकीय किंवा सामाजिक लाभासाठी काही माध्यमांकडून बातम्यांना विशिष्ट रंग दिला जातो, ज्यामुळे दोन गटांमध्ये जातीय तेढ निर्माण होते.

माध्यमांची जबाबदारी आणि नियम:विश्वासार्हता:

भारतीय प्रेस परिषदच्या पत्रकारितेच्या नियमांनुसार, कोणत्याही बातमीचे वार्तांकन करताना वस्तुनिष्ठता राखणे आणि जातीय सलोखा बिघडेल असे लेखन टाळणे बंधनकारक आहे.प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरो किंवा अधिकृत सरकारी सूत्रांद्वारे माहितीची शहानिशा करूनच बातम्या प्रसारित करणे आवश्यक असते. माध्यमांची जबाबदारी म्हणजे समाजाला अचूक, निष्पक्ष आणि खरी माहिती देणे होय. माहितीच्या अतिप्रवाहात (फेक न्यूज) विश्वासार्हता टिकवून ठेवण्यासाठी माध्यमांना नैतिक नियम आणि नियमांचे पालन करणे बंधनकारक असते. सध्याच्या डिजिटल युगात, माहितीचा प्रसार वेगाने होत असल्याने जागरूक नागरिक म्हणून स्वतःची डिजिटल साक्षरता वाढवणे आणि माहितीचे योग्य विश्लेषण करणे गरजेचे आहे.

# सावरकरांच्या स्वप्नातील बलशाली अभिनव भारत उभारणे हीच काळाची गरज-प्रा. डॉ.विल धारुरकर

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर : स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या स्वप्नातील बलशाली आधुनिक भारत उभारणे हीच काळाची गरज आहे अशा शोषणमुक्त कृषी औद्योगिक भारतीय समाजाची जडणघडण करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे असे विचार प्रसिद्ध विचारवंत आणि माजी कुलगुरू डॉक्टर विल धारूरकर यांनी व्यक्त केले शालिवाहन संशोधन मंडळ आणि विवेकानंद विचार मंच या दोन संस्थांच्या वतीने एन ३,सिडको येथे विवेकानंद मैदानावर आयोजित सावरकर प्रेमी नागरिकांच्या उपस्थितीत बोलताना त्यांनी हे विचार मांडले.

विवेकानंद मैदान एन ३ सिडको येथे झालेल्या या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवशंकर मुंडे हे होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सिडको वॉकर्स क्लबचे अध्यक्ष शिवाजीराव रामरुले हे उपस्थित होते. प्रारंभी विवेकानंद विचार मंचचे संयोजक विजय जोग यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. आणि संस्थेच्या कार्याचे परिचय करून दिला व पाहुण्यांची ओळख करून दिली. श्री शिवशंकर मुंडे यांच्या हस्ते डॉ. धारूरकर यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

आपल्या भाषणात डॉ वि ल धारूरकर पुढे म्हणाले की स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवनकार्याचे खरे मर्म कशात असेल तर त्यांच्या प्रखर सांस्कृतिक राष्ट्रवादात आहे. सावरकरांच्या जीवनाचे दोन टप्पे पडतात, त्यांच्या जीवनाचा पहिला कालखंड हा नाशिक ते पुणे असा असून फर्ग्युसन महाविद्यालयात त्यांनी घेतलेले पदवीचे शिक्षण आणि



लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वाखाली त्यांनी केलेली विदेशी कपड्यांची होळी तसेच लंडनला कायद्याच्या अभ्यासक्रमासाठी जाण्यास त्यांना शिवाजी शिष्यवृत्ती लाभली त्यामुळे त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली.

सावरकरांच्या जीवनातील दुसरा कालखंड हा धगधगत्या होमकुंडासारखा तेजस्वी असल्याचे सांगून ते पुढे म्हणाले की लंडन मधील पाच वर्षाच्या वास्तव्य काळात सावरकरांनी संशोधन क्रांतिकार्याचे संघटन आणि भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यातील एका रोमहर्षक पर्वाचा प्रारंभ केला.

जगाच्या इतिहासात वर्तमानपत्रात प्रकाशित झालेल्या बातमीपत्रावर स्वातंत्र्यापर्यंत बंदी हे एकमेव उदाहरण आहे. सावरकरांनी काळ आणि विहारी या साप्ताहिक यात लिहिलेल्या लंडनच्या बातमीपत्रावर इंग्रजांनी सतत बंदी घातली होती. लंडनमध्ये असताना सावरकरांनी जोसेफ मॅशनेचे चरित्र लिहिले आणि ते वाचून भारतात क्रांतिकारकांची पिढी तयार झाली या ग्रंथाची प्रस्तावना देशभक्तीने ओथंबलेली आहे. तसेच १८५७ चे स्वातंत्र्यसमर हा ग्रंथ लिहून त्यांनी १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यातील अखिल भारतीय सहभागाचे स्वरूप स्पष्ट केले. पुढे हिंदी तरुणांचे संघटन करून सावरकरांनी क्रांतीपर्वाला प्रारंभ केला. लंडनमध्ये रामजन्माचा उत्सव आयोजित केला तेव्हा देशभक्त मोहनदास करमचंद गांधी हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. त्यांनी सावरकर हिंदी तरुणांचे संघटन करत आहेत याबद्दल त्यांचे कौतुक केले आणि तरुणांनी प्रभू रामचंद्रांच्या आदर्शाचे पालन निष्ठेने करावे असेही सूचित केले. सावरकरांनी लंडनमध्ये गुरुगोविंद सिंह जयंती सुद्धा साजरी केली होती. मदन मोहन भिंगरा यांनी कर्झन वायलीची हत्या केल्यानंतर सावरकरांना केव्हाही अटक होणार होती तेव्हा ब्रायटनच्या समुद्रधुनीवर उभे राहून त्यांनी रचलेले ''ने मजसी ने परत मातृभूमीला सागरा प्राण तळमळला'' हे अमर काव्य म्हणजे सावरकरांच्या लंडनमधील वास्तव्याचे शिखर होय.

मार्शलिस बेटा जवळ एस एस मोरया ही नौका पोहोचली असता सावरकरांनी सागरात उडी मारली आणि सबंध जगात त्यामुळे भारतीय स्वातंत्र्याची ललकारी पोहोचली हे त्रिखंडात गाजलेली उडी होती. असे सांगून डॉक्टर धारूरकर म्हणाले सावरकरांची केस काल मार्क्सचे नातू जिम मार्केट यांनी लढविली ते म्हणाले होते की सावरकर हे क्रांतिकारी तरुण आणि समाज सत्तावादी विचाराचे भारत भाग्यविधाते आहेत. त्यामुळे सावरकरांची बाजू मार्चच्या नातवाने मांडली ही गोष्ट अनेक जण विसरतात. असेही त्यांनी नमूद केले अंदमानच्या वास्तव्यात सावरकरांनी शुद्धी चळवळ विकसित केली. राष्ट्रभाषा हिंदीचा प्रसार केला, स्वदेशीचा मंत्र पसरविला आणि तेथील कैद्यांच्या हालअपेष्टा व्हाईसरॉयच्या सचिवापर्यंत पोहोचविल्या आणि भारतीय कारागृहाच्या व्यवस्थेत पहिली सुधारणा कोणी घडून आणली असेल तर ती सावरकरांनी घडवून आणली आहे. असेही ते म्हणाले रत्नागिरीमध्ये पोहोचल्यानंतर सावरकरांनी पहिले महत्त्वाचे कार्य म्हणजे एसएमसीएल ऑफ हिंदुत्व हा ८८ पानांचा ग्रंथ लिहिला व या ग्रंथाची प्रत त्यांनी डॉ केशव बळीराम हेडगेवार यांना सुपूर्द केली डॉ हेडगेवार यांनी १९२२ साली हा ग्रंथ नागपूर मध्ये विश्वनाथ केळकर यांच्या मदतीने प्रकाशित केला, तेव्हा या ग्रंथाचे लेखक सावरकर हे अमराठा अशा नावाने हा ग्रंथ प्रकाशित झाला, या ग्रंथाने भारताच्या सांस्कृतिक राष्ट्रवादाची मुहूर्तमेढ रोवली गेली. सावरकरांनी लिहिलेल्या विज्ञान इष्ट निबंधामुळे भारतामध्ये बुद्धिप्रामाण्यवादी विज्ञान अनिष्ट विचारांचा पाया घातला गेला स्वातंत्र्यानंतर त्यांनी अभिनव भारताचे विसर्जन करून नवभारताचे उभारणीचा नवा मार्ग दाखविला. धनंजय कीर यांनी लिहिलेल्या वीर सावरकर अँड हीस टाइम्स या ग्रंथाबद्दल ते असे म्हणाले हा ग्रंथ अव्वल आणि तेवढ्याच मधुर इंग्रजी भाषेत लिहिला असून तो वाचला असता त्यातील शैली मांडणी आणि सावरकर चरित्राची सलग अशी विमांसा प्रकट होते.

याप्रसंगी शेवटी डॉ. गणेश महाजन यांनी सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमास सिडको परिसरातील ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी एडवोकेट संतोष निमरोट तसेच मुद्द्यावर बोट या वाहिनीचे संपादक अनंत पांचाळ तसेच माजी न्यायमूर्ती श्री कुलकर्णी भारतीय जनसंघाचे जुने कार्यकर्ते श्री आश्वनी खुल्लर तसेच आनंद परळीकर, श्री मनोज बोहरा समाज सेवक डॉ अरविंद मुळे, श्रीकांत अक्कलकोटकर, डॉ रामदास सकपाळ, श्रीराम कुलकर्णी सर, गणेश महाजन सर, बक्षी सर, झिंगाडे सर वॉकर्स क्लब अध्यक्ष श्री शिवाजीराव रामरुले सर श्री अनंत पवार सर, गोरक्षनाथ शिरसे, दौलतराव म्हस्के सर दत्तोपंत ठेगडी. इत्यादी बहुसंख्येने उपस्थित होते.

# हिमालयातील साहसी ट्रेक

ज्योतिर्मय साहित्य

निसर्गाशी संवाद साधणारी जीवनयात्रा म्हणजे ट्रेक. हिमालय म्हणजे केवळ बर्फाच्छादित पर्वतरांगांचा समूह नाही; तो भारतीय संस्कृतीचा श्वास आहे, ऋषिमुनींच्या तपश्चर्येचा साक्षीदार आहे आणि साहसप्रेमींच्या स्वप्नांना पंख देणारा दिव्य प्रदेश आहे. ''हिम'' म्हणजे बर्फ आणि ''आलय'' म्हणजे निवासस्थान बर्फाचे घर अशी हिमालयाची ओळख. परंतु या बर्फाळ घरामध्ये असंख्य वाटा आहेत, ज्या माणसाला केवळ पर्वतांकडे नाही तर स्वतःच्या अंतरंगाकडे घेऊन जातात. त्या वाटा म्हणजे हिमालयातील ट्रेकिंग मार्ग.

ट्रेकिंग म्हणजे फक्त चालणे नाही; ती स्वतःशी भेट घडवणारी यात्रा आहे. एका बाजूला आकाशाला भिडणारी शिखरे, दुसऱ्या बाजूला खोल दऱ्या, पायाखाली बर्फ, कानात घुमणारा वाऱ्याचा आवाज आणि डोळ्यांसमोर निसर्गाचा विराट आविष्कार या साऱ्यांमध्ये माणूस क्षणभर स्वतःला विसरून जातो.

**भारताच्या हिमालयीन राज्यांमध्ये अनेक अद्भुत ट्रेक आहेत. प्रत्येक ट्रेकचे स्वतःचे वैशिष्ट्य, इतिहास, सौंदर्य आणि आव्हान आहे.**

**१. रूपकुंड ट्रेक उत्तराखंड**

उत्तराखंडमधील हा ट्रेक ''स्केलेटन लेक ट्रेक'' म्हणून प्रसिद्ध आहे. रूपकुंड तलाव समुद्रसपाटीपासून सुमारे ५,०२९ मीटर उंचीवर आहे. या तलावाच्या काठावर सापडलेल्या मानवी सांगाड्यांमुळे या प्रदेशाभोवती गूढतेचे वलय निर्माण झाले आहे.

या ट्रेकमध्ये हिरवीगार ''अली बुग्याल'' आणि ''बेदनी बुग्याल'' ही विस्तीर्ण गवताळ कुरणे दिसतात. उन्हाळ्यात या कुरणांवर रंगीबेरंगी फुले उमलतात, तर हिवाळ्यात बर्फाची शुभ्र चादर पसरते. सकाळच्या



सूर्यकिरणांत चमकणारे त्रिशूल पर्वत पाहताना मन भारावून जाते.

रूपकुंड ट्रेक साहसी मानला जातो, कारण येथे हवामान क्षणार्धात बदलते. कधी दाट धुके, कधी बर्फवृष्टी, तर कधी सूर्यकिरणांची सोनेरी उधळण निसर्गाचे सारे रंग येथे अनुभवायला मिळतात.

**२. चादर ट्रेक – लडाख**

लडाखमधील चादर ट्रेक हा भारतातील सर्वात रोमांचकारी ट्रेक मानला जातो. हा ट्रेक झंस्कार नदीवर गोठलेल्या बर्फाच्या थरावर केला जातो. नदी पूर्णपणे गोठल्यानंतर तिच्यावर तयार होणारी बर्फाची ''चादर'' म्हणजेच या ट्रेकचे नाव.

हा ट्रेक साधारण ३,३८० ते ३,८५० मीटर उंचीवर होतो. तापमान कधी कधी उणे २५ ते ३० अंश सेल्सियसपर्यंत खाली जाते. त्यामुळे हा ट्रेक मानसिक आणि शारीरिक दोन्ही प्रकारची परीक्षा पाहतो.

रात्री बर्फाच्या गुहांमध्ये किंवा तंबूंमध्ये मुक्काम करताना आकाशातील असंख्य तारे पाहून मन थक्क होते. झंस्कारच्या दऱ्या जणू हिमनदीच्या शांत कविताच वाटतात.


✍

**सौ सुरेखा राजेंद्र शेजवळ मा.**

**उपशिक्षिका कन्या शाळा, सातारा.**

**फोन** : 9822749758




**३. गोइचाला ट्रेक – सिक्कीम**

सिक्कीममधील गोइचाला ट्रेक हा कांचनगंगा पर्वताचे अप्रतिम दर्शन घडवणारा ट्रेक आहे. हा ट्रेक सुमारे ४,९४० मीटर उंचीपर्यंत जातो.

येथील जंगलांत रोडोडेंड्रॉनची रंगीत फुले, धबधबे, हिमनद्या आणि बर्फाच्छादित शिखरे दिसतात. पहाटेच्या वेळी कांचनगंगेवर पडणारे सूर्यकिरण म्हणजे निसर्गाने उधळलेले सुवर्णकाव्यच!

गोइचाला ट्रेक मनाला शांतता देतो. येथे निसर्ग इतका निर्मळ आहे की शहरातील गोंगाट विसरून माणूस अंतर्मुख होतो.

**४. हम्प्टा पास ट्रेक – हिमाचल प्रदेश**

हिमाचल प्रदेशातील कुलू आणि स्पिती खोऱ्यांना जोडणारा हा ट्रेक अत्यंत लोकप्रिय आहे. हम्प्टा पासची उंची सुमारे ४,२७० मीटर आहे.

या ट्रेकचे वैशिष्ट्य म्हणजे निसर्गातील विलक्षण बदल. एका बाजूला हिरवीगार कुलू खोरे, तर दुसऱ्या बाजूला कोरडे आणि थंड स्पितीचे वाळवंटी सौंदर्य! काही दिवसांतच निसर्गाचे दोन टोकाचे रूप येथे पाहायला मिळते.

धबधबे, बर्फाचे पूल, नद्या आणि हिरवी दरी यांमुळे हा ट्रेक नवशिक्यांसाठीही आकर्षक मानला जातो.

**५. केदारकंठ ट्रेक – उत्तराखंड**


हिवाळ्यातील ट्रेकिंगसाठी केदारकंठ अत्यंत प्रसिद्ध आहे. सुमारे ३,८१० मीटर उंचीवरील हे शिखर उत्तराखंडमध्ये आहे.

बर्फाच्छादित देवदार वृक्ष, शांत जंगल आणि शिखरावरून दिसणारा सूर्योदय मनाला मोहवून टाकतो. सकाळी सूर्य उगवत असताना हिमालयाची शिखरे केशरी रंगाने उजळतात; जणू देवांनी सुवर्णरंगाची आरती केली आहे असे वाटते.

**६. पिन पार्वती पास ट्रेक – हिमाचलप्रदेश**

हा ट्रेक अत्यंत कठीण आणि अनुभवी ट्रेकर्ससाठी योग्य मानला जातो. त्याची उंची सुमारे ५,३१९ मीटर आहे.

(क्रमशः)



# जात्यावरच्या ओव्या......

काय सांगू महती
गायी-वासराचं गाव
दुधातुपाला उताडा
गोकुळ याच नाव ||६६७||

काय सांगू महती
शेती पिकली मोत्याची
तिथ राबती कष्टती
बैल घरच्या गायीची ||६६८||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ३६

ज्योतिर्मय 📖 साहित्य

**सदा सर्वदा देव सन्निध आहे ।**
**कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे।**
**सुखानंद आनंद कैवल्यदानी ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।३६।**

अर्थ : परमेश्वर कायम आपल्याजवळच आहे. फक्त तो आपली परीक्षा आणि धैर्य पाहतो. सुख, आनंद आणि कैवल्य यांचा तो दाता आहे. असा हा परमेश्वर आपल्या भक्तांचा अभिमानी असून त्यांच्याकडे तो कधीही दुर्लक्ष करत नाही.

(सन्निध – समीप/जवळ,
अल्प धारिष्ट – परीक्षा/कसोटी,
कैवल्य – मोक्ष)





विवेचन : आधीच्या श्लोकात समर्थ परमेश्वर आपल्या कोणत्या भक्तांचे रक्षण करतो ते आपल्याला सांगतात. तर या श्लोकात हा परमेश्वर कोठे आहे, त्याचा वास कोठे आहे हे ते आपल्याला सांगतात. ते म्हणतात सदा सर्वदा देव सन्निध आहे म्हणजे जवळच आहे. व्यवहारामध्ये आपण सन्निध या शब्दाचा अर्थ जवळ किंवा समीप असा घेतो परंतु अध्यात्मामध्ये सन्निध म्हणजे अंतर्यामी. त्या परमेश्वराला शोधायला दूर कुठेही जावे लागत नाही. त्याचा वास आपल्या अंतर्यामीच असतो. आणि तिथे तो सदा सर्वदा म्हणजे कायमस्वरूपी असतो. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर परमेश्वर आणि आपण वेगळे नाहीच आहोत.

असे जर आहे तर मग आपल्याला त्याचे अस्तित्व का जाणवत नाही ? आपली देहबुद्धी एवढी प्रबळ असते की त्यामुळे हा देह म्हणजे मी नाही आणि आपल्या अंतरात्म्यात त्याचा वास आहे हे आपल्याला जाणवतच नाही. सकाळी उठल्यानंतर आपण '' कराग्रे वसते लक्ष्मी, कर मध्ये सरस्वती, करमूले तू गोविंदम प्रभाते कर दर्शनम'' हा श्लोक म्हणतो त्याचा अर्थ हाच आहे. आपल्या अंतर्यामी परमेश्वर वसतो आहे.

आपल्याला त्याचे अस्तित्व जाणवत नाही परंतु साधकांना मात्र पदोपदी त्याच्या अस्तित्वाची जाणीव होते. आपण आपले मूळ स्वरूप विसरल्यामुळे आपल्याला त्याच्या अस्तित्वाची जाणीव होत नाही. परंतु तुकाराम महाराजांसारखे संत ईश्वर चिंतनातच रममाण झालेले असल्यामुळे त्यांना स्वतःचे असे वेगळे अस्तित्व नसते. परमेश्वर कायम आपल्याबरोबरच आहे याची जाणीव त्यांना होत असते. म्हणूनच ते म्हणतात

जेथे जातो तेथे तू माझा सांगाती ।
चालविशी हाती धरुनिया ।।**(क्रमशः)**




# || संजय उवाच... ||



@संजय काव्या पुणे 7743918559

✍ गंमत

गंमत एखाद्याची अशी करू नये की त्याचा इगो दुखावल्या जाईल, करमणूक अशी करावी की ज्याने समोरच्याच मन हलके होईल नाही की त्याला कोणताही त्रास होईल. गंमत करायला जावी अन आपली गंमत होऊ नये.

# अखंड समाधानाचा मार्ग : नामस्मरण: वृद्धांना उपदेश



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय 📖 साहित्य

अखंड रामसेवा ज्याला लाभली । धन्य धन्य त्याची माउली ।। स्वार्थरहित रामसेवा । याहून दुजा लाभ न जीवा ।। वाचेने भगवंताचे नाव । कायेने भगवंतसेवा । चित्ती भगवंताचे ध्यान । आपण रहावे रामार्पण । याहून अन्य सेवा । कोणतीही नाही जाण ।। जे जे दिसते ते ते नासते । हा बोध घेऊनि चित्ती । सज्जन लोक जगी वर्तती । तैसे तुम्ही आता वागा जगात ।। मुलां-बाळांस सांभाळून राहावे । प्रपंचात उदास न व्हावे ।। प्रपंचाची उपाधि । आता मनात न आणावी ।। उपाधिवेगळे झाला । ऐसे ऐकू द्यावे मला ।। उपाधीत राहिला । परि चित्ताला न वास दिला । ऐसे ठेवा मनी । राम आणावा ध्यानीं । आता यापरतें हित । नाहीं दुसरे जगांत । हा माझा बोल । न मानावा फोल ।। आता रामा तुझा झालो । कर्तेपणातून मुक्त झालों । ऐसें आणावे मनांत । शक्य तितके राहावे नामात । याहून दुसरें न आणावे मनांत ।। लौकिकांतील मानापमान । यांचे सोडावें उदक । ध्यानीं आणावा रघुनंदन एक ।। बायको-मुलांबाळांत राहावे । चित्त रामाकडे ठेवावें । होईल तेवढे नाम घ्यावें ।। अंतरी परमात्मा त्यास । ठेवून साक्ष भावे भजावे रघुनाथास । न सोडावा मनाचा धीर । मागे आहे रघुवीर ।।

वृद्धपण आलें । शरीर क्षीण झालें । तरी आपण अभिमान घेऊनच राहिले । त्यास सोडावें दूर । प्रपंचांत वृद्धपणीं न पाहावें । मुलांस मार्ग दाखवून सुखी राहावें । औषध पथ्यपाणी सांभाळावें । पण दुःखी कष्टी कधीं न व्हावें ।। शरीरसंपत्ति क्षीण झाली । तरी वृत्ति क्षीण नाही बनली ।। जोवर देहाची संगति । तोवर 'मी-माझें' ही वृत्ति ।। आता वृत्ति राखावी रामापाशी । दुजी उठू न द्यावी त्यापरती ।। आजवर जें घडलें । ते प्रापंचिक, पारमार्थिक असो भले । तें रामकृपेने झाले । हे ठेवावे चित्तीं । आता न सोडावा रघुपति ।। वयोमानानें शरीर होतें क्षीण । वागणें आहे फार जपून ।। देह आळशी न ठेवावा हे जरी खरें । तरी त्याची परिस्थिति ओळखून राहणे हे बरे ।। आता आपण झालो शरीराचे अधीन । हे वयोमानानें दृश्य भासत । तरी भाव ठेवा रामापायीं । ज्याला क्षीणता कधीं आली नाहीं ।। चित्तीं राखावें समाधान । आनंदानें संसार करावा जाण ।। समाधानाचें करावे जतन । ते नसावें कशावर अवलंबून ।। लाभहानींत न गुंतवता मन । राखता येईल समाधान ।। समाधानाला अडवणूक जाण । माझा मीच आपण ।। देहाचे भोग ठेवावे देहाचे माथीं । समाधानांत राखावी वृत्ति ।। सर्व कर्ता राम हा भरवसा ठेवावा ठाम । मग काळजींचे उरलें नाहीं काम । हे सर्व जुळतें म्हणतां राम राम ।। तरी सर्वांनीं घ्यावे रामनाम । व्हावें परमात्म्याचे आपण । कृपा करील रघुवीर ।।

मागणे तुम्हा एकच पाही । नामावाचून दूर कधीं न राही ।।

# || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

. ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी निर्मितीचे
. प्रयोजन कोणते?

पुढे..........

गीता शास्त्र आणि ज्ञानेश्वरी वस्तूत: एकच आहेत उलट ज्ञानेश्वरीत त्याचे विस्तारीकरण अधिक चांगल्या पद्धतीने केलेले आहे. आपणासअनेक शास्त्रीय ग्रंथ हे उपलब्ध आहेत, तरी या सर्व शास्त्रात गीता शास्त्र हे मोक्षदायी स्वतंत्र आहे. इतर शास्त्रे परतंत्र आहेत म्हणजे बोलाचीच कढी बोलाचाची भात, असे सांगणारे आहेत. ते विधी निषेधात्मक आहेत. सर्वच प्रकारची उधारी उसणवारी, कर्जबाजारी आहे. आणि या गीताशास्त्रात नकदही देना नकदही लेना. इथे स्विच दाबण्यापुरते बोलणे बाकी सर्व प्रत्यक्ष विज्ञान आणि प्रयोग आहेत.

साचची बोलाचे हे नव्हे शास्त्र/ पैस संसार जिनते शस्त्र/ आत्मा अवतरविते मंत्र अक्षरे इये //15/576

अतिंद्रीय अव्ययाचे ज्ञान विज्ञान साक्षात तात्काळ अनुभव आहेत ते अनुभवही सहजची योग घडे नाभ्यासिता असे आहेत. म्हणून हे शास्त्र अपूर्व व अवलौकिक व पूर्ण शास्त्र आहे. गीता शास्त्र हे प्रवृत्तीत राहून काय व कसे करा व ज्ञान विज्ञान आणि प्रयोगांचा उपयोग करावयास प्रवृत्त करते. प्रवृत्तीतून सहज निवृत्त होण्याची कुशलता शीकविते. शारीरिक रोग निवारण्यासाठी जसे शरीर शास्त्र, आरोग्य शास्त्र, सांगितले जात नाही तर प्रत्यक्ष योग्य चिकित्सा म्हणजेच औषधे खाऊन रोग नाहीसा करावा लागतो, तसे संसार रोग नाशा साठी शास्त्र सांगून अनंत जन्मात लव ही लाभ होत नाही. तर त्यासाठी रक्त मन बुद्धी अहंकार व प्राणांची कारण शरीरापर्यंत पंचकोश चिकित्सा करावी लागते. ही चिकित्सा(उपचार) सांगणारे जे शास्त्र आहे त्याला योगशास्त्र नाव आहे. भगवंताने गायलेल्या गीतेत उपनिषदातील व ब्रह्मविद्येमधील हे योगशास्त्र आहे. भगवत् योगशास्त्र आहे. हे सहज आहे. आपोआप अनायास होणारे आहे. मानवादी अष्टांग योगात करणे आहे, म्हणजे योग आसने ,प्राणायाम अशा क्रिया स्वतः होऊन कराव्या लागतात. पण महायोगात करणे नाही. त्याचा गंधही नाही. उपयोगही नाही. तर इथे होणाऱ्या क्रिया आपोआप होतात. हे सकलार्थ मती प्रकाशक आहे. म्हणून बुद्धी योगशास्त्र आहे. हे भक्ती प्रधान आहे. म्हणून हा भक्ती योग समस्त बुद्धी योग आहे. हा योग बुद्धीतील क्लेश नष्ट करून ऐश्वर्य उत्पन्न करून शाश्वत महानंद शांत आनंद देणारा आहे. या योगा सारखे सोपे जगी काय आहे? (कैसा विश्वाचीया कृपा/ करुनी महानंद सोपा /अर्जुन व्याजे रूपा आणिला देवे// 18/1687. क्रमशः...




♦स्क्रीन टाईमवर पायबंद हवा

आज आपण तांत्रिक व एआयच्या युगात जगतो. म्हणून जीवनात, भावनेत बदल दिसतात. आपण 24 तास स्क्रीनशी बिझी असतो. तर आपणास 10 मिनिटे शांती मिळेल का? आज घराघरात दूरदर्शनची व बाहेर हातात कचेरीत फोनच्या स्क्रीनवर जणू बहिरे होऊन वावरतो. आधीच या धावपळीच्या गर्दीने, प्रदूषणामुळे नाकी नवू आले आहे... गाड्या, धूर, आवाज व रहदारीच्या भयंकर चक्रात वावरतो. नाइलाज म्हणून गॅझेटचा ऊपयोग करावाच लागतो. आधीच्या टि.व्ही च्या रिमोट वरून आता बोटाने ॲप वर मारामारी आहे. भावनाशून्य मेसेज ईमोजी स्माईल राईट
चूक अंगठा, डिलीट, टायपिंग ऊफ नुसता धुमाकुळ. पाच मिनिटं शांतता नाही! आजच्या जाहीराती व व्हिडीओच्या जगात पैसा, सोनं, चांदीपेक्षा अटेन्शन महत्वाचे. सर्व गोष्टी भडीमार त्यामुळे शांतता प्रेम माया आपुलकी संस्कृती संस्कार मानवता लुप्त होत आहे असे वाटते. म्हणून मुद्दाम वेळ काढा आणि या स्क्रीनवर पायबंद घालणे आवश्यक आहे. ओके, गूडडे गूड मार्निंग आपला दिवस आनंदी जावो हिच गुरू चरणी प्रार्थना.




# रात्री झोपण्यापूर्वी खा फक्त दोन विलायची : सकाळी पाहा याचे कमाल

ज्योतिर्मय 📖 साहित्य

आयुर्वेदिक ग्रंथांप्रमाणे विलायची पचनक्रियेत मदत करते. जर तुम्हाला अपचनाची समस्या आहे तर रात्री दोन विलायची, अद्रकचा छोटा तुकडा, थोडीशी लवंग आणि धने बारीक करा. हे पावडर गरम पाण्यासोबत घ्या. पोटासंबंधीत सर्व समस्या दूर होतील.

२ श्वासाची दुर्गंधी दूर होते.

विलायचीमध्ये अँटी-बॅक्टेरियल गुण असतात.

यासोबतच विलायचीची तिखट चव आणि सुगंध, श्वासांची दुर्गंधी दूर करते. ही डायजेस्टिव्ह सिस्टीमला मजबूत करते.

रोज जेवण केल्यानंतर एक विलायची खा किंवा रोज सकाळी विलायचीचा चहा प्या.

३ ॲसिडिटीपासुन आराम

विलायचीमध्ये उपलब्ध असलेले तेल ॲसिडिटीला नष्ट करते. विलायची चावल्यानंतर त्यामधून अनेक प्रकारचे तेल बाहेर पडतात. जे तुमच्या लाळ ग्रंथींना उत्तेजित करतात. यामुळे तुमचे पोट चांगल्या प्रकारे कार्य करते. विलायची खाल्लावर त्यामधील तेल गारवा देते. यामुळेच विलायची चावल्यावर होणारी ॲसिडिटीची जळजळ दूर होते.

४ फुफूसांसंबंधीत आजारांचा नैसर्गिक इलाज :

विलायची दमा, खोकला, सर्दी आणि फुफूसांसंबंधीत आजारांपासुन आराम देते. आयुर्वेदात इलायचीला एक गरम मसाला मानले जाते. ही शरीराला आतुन गरम ठेवते. विलायचीचे सेवन केल्याने कफ बाहेर पडतो. सर्दी, खोकला किंवा छातीत कफ असेल तर विलायचीचे सेवन केल्याने या समस्या दूर होतात. जर तुम्हाला सर्दी झाली तर वाफ घेताना गरम पाण्याच्या भांड्यात थोडेसे विलायची तेल टाका.

५ एनीमियापासून वाचवते.

एक ग्लास गरम दूधामध्ये एक-दोन चिमुट विलायची पावडर टाका. तुम्ही तुमच्या आवडीनुसार साखर देखील टाकू शकता. एनीमियाचे लक्षण आणि अशक्तपणापासुन आराम मिळवण्यासाठी हे रात्री प्या.

६ कॅंसरपासून बचावते :

विलायची मॅंगनीजचे एक प्रमुख स्त्रोत आहे. मॅंगनीज एंजाइमच्या स्रावमध्ये महत्त्वाची भूमिका निभावते. हे फ्री रॅडिकल्सला नष्ट करते. याव्यतिरिक्त विलायचीमध्ये शरीरातुन विषारीतत्त्व बाहेर काढण्याचे गुण असतात.

ही कॅंसरपासुन वाचवण्याचे देखील काम करते.

७ हृदयाची गती नियमित करते.

विलायची पोटॅशियम, कॅल्शियमसारख्या खनिजांनी परिपूर्ण असते. यामुळे ही शरीरातील इलेस्ट्रोलिसिस प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका निभावते. विलायची हृदयाची गती नियमित करण्यात मदत करते. सोबतच विलायची ब्लडप्रेशरला नियंत्रित करते. यामुळे जर तुम्ही आपल्या हार्टला नेहमी हेल्दी ठेवू इच्छिता तर नियमित विलायचीचे सेवन करा किंवा विलायचीची चहा पिण्यास सुरुवात करा.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

# प्रभातपुष्प

षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

ग्रंथ गुरु

देती जीवन जगण्यासाठी
ज्ञान सखोल छान
ग्रंथ गुरु असती
गोड ही शिदोरी
वाचन करुन सर्व
मनोभावे सदा पूजती

ग्रंथ गुरु खरे
सखोल ज्ञान अन्
मार्गदर्शनही छान देती
वाचनाने ज्ञानप्राप्ती होते
जीवनसार कळून येता
भविष्यवाट सुखकर होती

# बदनापुरच्या बाजार वाहेगावमधे ज्ञानांकुर अभ्यासिकेचा उद्घाटन सोहळा उत्साहात संपन्न

ज्योतिर्मय साहित्य

बदनापूर : मौजे बाजार वाहेगाव तालुका बदनापूर येथे दिनांक २७ मे २०२६ रोजी जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा.डॉ. कृष्ण कांत कनवरिया साहेब ()यांच्या हस्ते लोक सहभागातून उभारलेल्या ''ज्ञानांकुर अभ्यासिकेचे ''मोठ्या थाटात उद्घाटनकरण्यातआले. विद्यार्थिनींनी डॉ. कृष्णकांत कनवरिया यांचे साहे औक्षण केले. नंतर त्यांनी '' छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून'' अभ्यासिकेच्या दालनाचे मा.कृष्णकांत कनवारीया व सरपंच कस्तुराबाई नरवडे यांच्या हस्ते उद्घाटन सोहळा उत्साहात संपन्न झाला.

मुख्य कार्यकारी अधिकारीडॉ. कृष्णकांत कनवरियाचां सत्कार ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने उपसरपंच अंकुश काळे व ग्रामसेवक ग्रामविकास अधिकारी गायकवाड यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भारतीय संविधानाची एक प्रत व एक रोप देऊन करण्यात आला.त्यानंतर



गावकऱ्यांच्या वतीने साहेबांचा सत्कार राजेंद्र चौधरी, ज्ञानेश्वर काळे, कैलास काळे, शिवाजी आरसूड व इतर गावकऱ्यांनी शाल,श्रीफळ , पुष्पगुच्छ, देऊन करण्यात आला.

डॉ.कृष्णकांत कनवरिया यांनी गावाच्या अभ्यासिका समितीतील सदस्यांची, विद्यार्थ्यांची मनापासून प्रशंसा केली.विद्यार्थ्यांचे प्रश्न ऐकून घेतले, पालकांशी संवाद साधला. विशेष म्हणजे त्यांच्या मनातील '' अभ्यासिका'' हा पायलट प्रोजेक्ट आहे, असेही सांगितले.गावातील लोकांनी लोक सहभागातून ही अभ्यासिका उभारल्याबद्दल साहेबांनी सर्वांचे अभिनंदन केले.

डॉ.कृष्णकांत कनवरिया यांचे हस्ते अभ्यासकेसाठी परिश्रम घेतलेल्या सर्व सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. त्यानंतर संघर्षपूर्ण परिस्थिती मधून शिक्षण घेऊन पहिली एम. पी.एस.सी. पास झालेली मुलगी व आज रोजी आयकर विभाग छत्रपती संभाजीनगर येथे वर्ग दोन अधिकारी पदावर कार्यरत असलेली आस्था इंगोले हिचा सत्कार करण्यात आला. तसेच इयत्ता पाचवी नवोदय परीक्षेत पास झालेल्या शिवतेज शिरसाठ, विराज काळे व युवराज इंगोले या मुलांचा व त्यांच्या पालकांचा, शिक्षकांचा, त्याचबरोबर शिक्षणाधिकारी म्हणून गावातील पहिली वर्ग एक अधिकारी होण्याचा मान मिळवलेल्या कु. क्रांती आरसूड या मुलीचा, अभ्यासिकेची संकल्पना ज्या युवकाने सर्वप्रथम मांडली तो युवक म्हणजे आनंद तिवारी व त्याचे आई-वडील , उच्चशिक्षित पोलीस पाटील सौ ज्योती नरवडे तसेच रायझिंग स्टार इंग्लिश स्कूल चे संस्थापक सचिव व संचालिका प्रमोद आरसूड व रेखा आरसूड या वरील सर्व यशस्वी विद्यार्थी, मान्यवरांचा कौतुक करून पुष्पगुच्छ देऊन डॉ. कृष्णकांत कनवरिया यांचे हस्ते सत्कार केला. अभ्यासिकेसाठी झटून उभी करणारे बाबू अण्णा काळे, भाऊसाहेब काळे, शिक्षक प्रभाकर आरसूड, विष्णू सोनटक्के, शिवाजी चव्हाण, रामेश्वर काळे, मारुती नरवडे, आस्था इंगोले, शिवाजी काळे, ज्ञानदेव लाहोरे, प्रमोद आरसूड, दादासाहेब काळे, विजय दाभाडे, संजय सोनटक्के, कैलास काळे, उद्धव जिजा काळे एस. के. मोरे यांच्या विषयीडॉ.कृष्णकांत यांनी भाषणातून मनापासून कौतुक केले.

अध्यक्षीय भाषणामध्ये भाऊसाहेब नरवडे यांनी वर्षभर केलेल्या कामाची संकल्पना मांडली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक रामेश्वर काळे व विष्णू सोनटक्के यांनी केले.प्रास्ताविक शिक्षक मारुती नरवडे यांनी केले. आभार प्रदर्शन शिक्षक शिवाजी चव्हाण यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सरपंच, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य गावातील शिक्षणप्रेमी नागरिक, तरुण वर्ग, महिला भगिनी, गावातील सर्व कर्मचारी, सर्व गावकऱ्यांनी व भूमिपुत्र शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# ''गर्ल्स'' Be Brave !

ज्योतिर्मय साहित्य

प्रिती, सीमा, मनू, रिया. चौघी बालपणापासून पक्क्या मैत्रिणी. शिक्षणासाठी बाहेर गावी असलेल्या. चांगल्या सुशिक्षित एरियामध्ये रूम घेऊन राहणाऱ्या या चौघी. तडफदार, डेअरिंग, कडक, निडर अश्या. कॉलेज, क्लास संपल्यानंतर सरळ रूमला जायच्या. रोजरोज कॉलेज, क्लास यामुळे थोड्याश्या कंटाळलेल्या. तो कंटाळा झटकण्यासाठी म्हणून चौघीही बाहेर फिरायला गेल्या. खरेदी झाली. पाणीपुरी, वडापाव खाऊन दोन अडीच तासानंतर थेट रूमकडे निघाल्या. ऑटो बघत चालत चालत निघाल्या. ऑटो आला त्या बसल्या. ऑटोचालकाने सामसूम रस्त्याची वळण घेतली.

आणि फोन करून त्याच्या मित्रांना बोलावून घेतलं. या चौघी जणी त्याला ओरडल्या. ''कोणाला फोन केला, का बोलावून घेतलं मित्रांना''?. ऑटो चालकाने चक्क त्यांना धक्काबुक्की केली. ऑटोचालकाचे मित्र आले. ड्रिंक आणि स्मोक केलेले ती मुलं त्या चौघींना पाहून नकोनको ते अश्लील इशारे करू लागले. त्यांच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करू लागले, त्यांना स्पर्श करू लागले. मग काय एकीने लाल मिर्ची पावडर डोळ्यात टाकली, एकीने नेलकटरनी हातावर, मानेवर, डोक्यात, दोन्ही पायांच्या मधोमध घाव केले, एकीने त्यांच्या जखमेवर मीठ चोळलं तर एकीने १०० ला कॉल केला.

आईवडिलांनी यांना मुलीं सारखं नाही तर मुलासारखं वाढवलं. बालवयातच कराटे शिक्षण दिलं. त्यामुळे या चौघी निडर आणि धडाकेबाज होत्या. त्यांच्यासमोर दोन-चार मुलं आली म्हणून त्या घाबरलेल्या नव्हत्या. त्यांनी ओढणी, स्कार्फ कमरेला घट्ट बांधली आणि ''हम छोरियाँ थारेसे कम लागे हैं क्या''?. म्हणत त्या चौघी जणी मेरी कॉम आणि गीता, बबिता फोगाट बनून ऑटोचालकासहीत बाकीच्या मुलांना चांगलंच धुतलं. ''मुलींना एकटं बघून सामसूम जागी नेऊन त्यांना पुन्हा छेडणार का? परत कुठल्याही मुलीला असा त्रास देणार का?, तुमच्याही घरी स्त्री जात आहे. त्यांच्या सोबत जर कुणी असं वागलं तर तुम्ही काय करणार? आम्हीही कुणाच्या मुली आहोत. आमचीही काळजी घ्या. आमचंही संरक्षण करा''. म्हणत त्या सर्वांना खुप मारहाण केली. कुणाचेही चेहरे ओळखू येत नव्हते इतकी मारहाण केली. १०० ला कॉल केला. आणि त्या मुलांना पोलीस स्टेशन दाखवलं.

त्या चौघी जणी घाबरून, इकडे तिकडे धाव घेतली असती तर त्या सामसून ठिकाणी त्यांच्या मदतीसाठी कुणी येऊ शकले असते का? किंवा रडून त्या मुलांच्या पाया पडून, त्यांना विनवणी जरी केली असती तर नशेत असणारी ती मुलं त्यांना सोडून दिलं




असतं कि त्या मुलींसोबत कांही वाईट गैरप्रकार केला असता? पुढे काय घडलं असतं? याचा विचारही नकोसा वाटतो. पण आईवडिलांनी बालवयातच दिलेलं कराटेचं शिक्षण आणि त्या मुलींनी स्वतःबद्दल बाळगलेली खबरदारी खऱ्या अर्थाने आज त्या मुलींच्या कामी आलं. कि ज्यामुळे त्या त्यांचं स्वतःचं संरक्षण करू शकल्या.



✍ सौ. मनीषा सोन्नेकर/सोनकांबळे
देगलूर. 9960028899

मुलींनो, आजचा काळ निडर पणे जगण्याचा काळ आहे. रडून, घाबरून, लपून, गप्प बसून, स्वतःवर होत असलेल्या अत्याचाराला मुकपणे सहन करण्याचा हा काळ नव्हे. तर समोर आलेल्या प्रत्येकाला पायदळी तुडवत त्यांना आयुष्यभराची अद्दल घडवून धडा शिकविण्याचा काळ आहे. मुलींच्या बाबतीत घडणाऱ्या घटनांचा आढावा घेताना अंगावर भीतीचा शहारा येतो.

आज प्रत्येक मुलगी काळजी आणि भीतीमध्ये जगते आहे. मुलींच्या मनातून, विचारातून भीती कधी निघणार ईश्वर जाणो. मुलींनी मनात असलेल्या भीतीला दूर झटकून निडर बनणं आजच्या या युगात खुप गरजेचे आहे.

बस, ट्रॅव्हल्स, ट्रेन, शाळा, कॉलेज, ऑफिस. घराच्या अंगणाच्या बाहेरच्या जगात मुलगी कुठेही सुरक्षित नाही. ''एकटी मुलगी म्हणजे संधी नव्हे तर जबाबदारी असते''. जगाला हे कितीही जरी ओरडून सांगितलं, समजावून सांगितलं, कितीही घोषणाबाजी केली तरीही कुणालाही समजणार नाही. म्हणून मुलींनी ''स्व:आत्मसंरक्षण स्व:जबाबदारी'' म्हणत समोरच्याला भिडणं, नडणं म्हणजे येणाऱ्या पिढीला सशक्त बनवणे होय. घराबाहेर पडताना स्वत: जवळ नेहमी मोबाईल, लाल मिर्ची पावडर, नेलकटर, सुई, दाभण, वही, पेन या वस्तू ठेवाव्यात. जेणेकरून आपलं संरक्षण आपण स्वतः करू शकू. परिस्थिती हाताळण्याचा १००% प्रयत्न करावा. आणि मुलींच्या बाबतीत घडणाऱ्या घटनांचा अभ्यास करता आपण आपली स्वतःची कशी काळजी बाळगू शकतो हा विचार व अभ्यास करावा. मुलींनो होत असलेला त्रास मुकपणे सहन न करता त्यावर आवाज उठवत एक पाऊल पुढे टाका.

''गर्ल्स'' Be Brave...!

ज्योतिर्मय



Mutual Fund Online
Sahi hai.....
म्युच्युअल फंड ऑनलाईन
विनोद शिराळकर 9325383999

## 🌹 पैसा आणि त्याची टाइम व्हॅल्यु ....


मी तुम्हाला एक सोपा प्रश्न विचारणार आहे ...
त्या प्रश्नाचे उत्तर चुक अथवा बरोबर असे काही नाही. तर प्रश्न असा आहे.... मी तुम्हाला दहा हजार रुपये देणार आहे.हे पैसे स्विकारण्याचे दोन पर्याय आहेत.
1.रु दहा हजार आजच घ्यायचे.
2.रु दहा हजार 20 वर्षा नंतर घ्यायचे.
या दोन पर्यायांपैकी तुम्ही कुठला पर्याय निवडणार? तुमच्या पैकी नव्याण्णव पुर्णांक नव्याण्णव (९९.९९) टक्के लोक हे "दहा हजार रु आजच घ्यायचे " हा पहिला पर्याय निवडतील. याचं कारण आहे पैशाची टाइम व्हॅल्यु. दहा हजार रुपये विस वर्षा नंतर मिळणार असतील तर ते कुणालाच नको आहेत कारण विस वर्षांनंतर दहा हजार रुपयांचे मुल्यांकन आजच्या इतके असणार नाही याची सगळ्यांना कल्पना आहे.
हे मुल्य का कमी होते माहीत आहे? याची तीन कारणे आहेत.
१. महागाई अर्थातच इन्फलेशन.... : महागाई पैशाचे मुल्य कमी करत असते. आज शंभर रु ना मिळणारी वस्तू दोन तीन वर्षा नंतर शंभर ऐवजी एकशे दहा, एकशे वीस रुपयांना मिळेल... ही वाढलेली किंमत महागाई ठरवतं असते.
२.अपॉरच्युनीटी कॉस्ट: तुम्हाला आज मिळणार असलेल्या दहा हजार रुपयांचे मुल्य मी जे वचन देतो आहे त्यावर अवलंबून आहे.
मी आजच देतो असे म्हणुन पैसे आठवडा भर दिलेच नाहीत तर... हिच बाब मी वीस वर्षाचे जे वचन देतो आहे त्यावर पण लागु होते.
मी वीस वर्षानंतर देईन असे म्हटले तरी तुमच्या मनात असेच येणार की हे काही खरे नाही.
रु दहा हजार आजच माझ्या हातात असतील तर माझ्या हातात काही संधी असु शकतात.... उदाहरणार्थ ते दहा हजार रुपये मी एखाद्या व्यवसायात गुंतवू शकेल, त्या दहा हजार रुपयांचे मी सोने विकत घेऊ शकतो, शेअर बाजारात गुंतवणूक करु शकतो...वगैरे वगैरे. पण पैसे वीस वर्षानंतर मिळणार असतील तर या सगळ्या शक्यता मावळतात.
२. जोखिम आणि अनिश्चितता: "हाजीर सो वजिर" ही म्हण तुम्हाला माहिती आहेच. पैशाचे तसेच आहे.... जे पैसे तुमच्या हातात आहेत ते तुमचे. वीस वर्षानंतर मी असण्याची किंवा मी पैसे देऊ शकण्याची अनिश्चितता आणि जोखिम पण आहे.
मित्रांनो ही आहे पैसा आणि त्याची टाइम व्हॅल्यु.
हा लेख तुम्हाला आवडला का?
रु. दहा हजार मिळणार असतील (खोटे खोटे का होईना) तर कुणाला आवडणार नाही.


साहित्यिक मित्रांनो,
आता लिहा बिनधास्त कारण आता तुमच्या साहित्याला प्रकाशित करण्यासाठी आले आहे एक भव्य व्यासपीठ
ज्योतिर्मय
साहित्याचे विद्यापीठ
"ज्योतिर्मय" साहित्याचे विद्यापीठ.
साहित्यावरील प्रत्येक घटना, कथा, कविता, लेख, परीक्षण, पुरस्कार, संमेलन प्रत्येकाची नोंद आम्ही घेणार, मग विचार कसला करता!
हो जाओ शुरु....
या व्यासपीठावर तुमचे सर्वांचे स्वागत आहे.
- संजय व्यापारी, संपादक 7743918559
ज्योतिर्मय-साहित्याचे विद्यापीठ



## कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे

© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495







### अभावातून प्रभावाकडे...

पुढे......
४. साधन आणि साध्य
हा मुद्दा अद्वैतातील अंतिम उडी आहे.
माण्डूक्य कारिका – गौडपादाचार्य
*"न निरोधो न चोत्पत्तिर्न बद्धो न च साधकः*।"
अर्थ कोणी बांधलेला नाही कोणी साधक नाही कोणी मुक्त होणारा नाही
हे ऐकताना विरोधाभासी वाटते, पण हे परमार्थिक सत्य आहे.
व्यवहारात साधना आवश्यक आहे, परंतु अंतिम अवस्थेत साधनाही सोडावी लागते.
जसे नदी पार करण्यासाठी नाव हवी, पण पार गेल्यावर नाव डोक्यावर घेऊन फिरत नाहीत.
५. "जागृत आलस्य" – अकर्मातील जागरूकता
हे "आळस" नसून अकर्मभाव आहे.
भगवद्गीता ४.१८ "कर्मण्यकर्म यः पश्येत्..."
जो कर्मात अकर्म पाहतो, तो ज्ञानी आहे. याचा अर्थ बाहेर कृती चालू असली, तरी आत "कर्ता" नसतो.
रमण महर्षी
"सर्वात मोठी साधना म्हणजे शांतपणे 'मी कोण?' पाहणे."
६. शोधणारा आणि शोध
बृहदारण्यक उपनिषद "नेति नेति"
सत्य कोणती वस्तू नाही की ती मिळवावी लागेल.
आत्मा हा प्राप्त करण्याचा विषय नाही, तो स्वतःचे स्वरूप आहे.
म्हणून अद्वैत म्हणते:
तू सत्यापासून दूर नाहीस, तर "सत्य शोधणारी कल्पना"च पडदा आहे.
७. पूर्णत्वाचा सिद्धांत
हा वेदान्ताचा शिखरबिंदू आहे.
ईशावास्य उपनिषद "पूर्णमदः पूर्णमिदम्..."
पूर्णातून पूर्ण निर्माण झाले, तरी पूर्णच उरते.
अर्थ आपण अपूर्ण नाही.ज्ञअपूर्णतेची भावना ही मनाची निर्मिती आहे.
थोडक्यात:
ही प्रतिमा प्रत्यक्षात "अद्वैत वेदान्त", "योगवसिष्ठ", "अष्टावक्र गीता" आणि "झेन" यांच्या एकत्रित अनुभूतीचे चित्ररूप दर्शन आहे.
तिचा मुख्य संदेश असा साधना करा पण "मी साधक" ही ओळख पकडू नका। शांती मिळवायची वस्तू नाही, ती आपल्या स्वरूपात आधीपासून आहे। शोध थांबला की सत्य प्रकट होते।
कबीरदास म्हणतात:
"मोको कहाँ ढूँढे रे बन्दे, मैं तो तेरे पास में।"
आणि अष्टावक्र शेवटी म्हणतात –
"तू जे शोधत आहेस, ते शोधणाऱ्याच्या आधीपासून आहे."
■ ■ ■

## उत्तराखंडमधील एक निसर्गरम्य प्रवास



विश्वास देशपांडे, चाळीसगाव. 94037 49932


भाग - 5




पुढे......
आजचा आमच्या सहलीचा सहावा आणि अखेरचा दिवस. आज सकाळीच जिम कॉर्बेटच्या सफारीसाठी निघायचे होते. सकाळी साडेचारलाच उठलो. तयार होऊन बसमध्ये बसलो. जिम कॉर्बेट अभयारण्यापासून आमचे हॉटेल साधारण दहा किमी लांब होते. बरोबर पाच साडेपाचच्या सुमाराला जिम कॉर्बेटच्या धनगरी गेटजवळ पोहोचलो. तिथे सफारी जीप्स तयारच होत्या. तेथील अधिकाऱ्यांनी आमची आधार कार्ड्स ओळखीसाठी मागितली. जिम कॉर्बेट पार्कमध्ये मोबाईल नेण्यास बंदी घातली आहे. त्यामुळे मोबाईल गेटजवळ असलेल्या लॉकर्समध्ये जमा करावा लागतो. सफारी संपल्यावर आपल्याला तो परत मिळतो. वनाधिकाऱ्यांच्या परवानगीने कॅमेरा नेता येतो. जिम कॉर्बेट हा भारतातील सर्वात जुना आणि पहिला व्याघ्रप्रकल्प आहे. इंग्रज वंशीय भारतीय शिकारी जिम कॉर्बेट यांचे नाव या अभयारण्याला देण्यात आले आहे.

नामशेष होत चाललेल्या बंगाली वाघांचे संरक्षण करणे हा या पार्कचा प्रमुख उद्देश होता. त्यामुळे या प्रकल्पात वाघ हे पर्यटकांचे प्रमुख आकर्षण असतेच. आजमितीला जवळपास दोनशे पन्नास वाघ या अभयारण्यात आहेत अशी माहिती आमच्या गाईडने दिली. त्याशिवाय हत्ती, अस्वले, विविध वन्य प्राणी, पक्षी आणि वनस्पतींच्या विविध प्रजातींनी हे जंगल समृद्ध आहे.
जिम कॉर्बेटमध्ये जाण्यासाठी अनेक प्रवेशद्वारे आहेत. धनगरी किंवा धनगडी या प्रमुख गेटवरून आम्ही जीप सफारी घेतली. एका जीप सफारीसाठी साधारणपणे ७५०० रू एवढे शुल्क आकारले जाते. एका जीपमध्ये सहा व्यक्तींना परवानगी आहे. या जीप्स उघड्या असतात. त्यामुळे जंगलाचे सौंदर्य मनसोक्त पाहता येते. उन्हाळ्याच्या दिवसात सकाळी साडेपाच ते साडेआठ किंवा सहा ते नऊ वाजेपर्यंत या जंगल सफारी चालतात. संध्याकाळी तीन ते सहा अशी साधारण वेळ असते. उन्हाळा किंवा हिवाळा या ऋतूंप्रमाणे वेळा थोड्या बदलतात. क्रमशः.....

सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.
■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,
गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.
सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.
Dr Shaikh A H - 98606 99906

# शब्दांचा खळाळणारा – आनंदाचा झरा


**ज्योतिर्मय साहित्य**

शिरीष चिटणीसांच्या शब्दात सांगायचे झाली तर ''वेचत असताना शब्दांना, हाती आला हा खळाळणारा झरा.''

३८ लेखांचा हा त्यांचा संग्रह. यांना ललित लेख म्हणावे का नाही हा प्रश्न श्रीपाल सबनिसांना पडला. पण ललित गद्य लिहिताना कुठलेच बंधन नसते. जात कुळीचा विचार करण्याचे कारण नाही असे मला वाटते. त्यांची लेखणी चौफेर धावणारी आहे. आढावा घेणारी आहे. विषय कुठलाही असू दे, माहितीप्रद लिखाण असो, शब्दांचा नुसता धो धो पाऊस अनुभवयास मिळतो आणि तो निखळ आनंद देणार असतो म्हणूनच पुस्तकाचे नाव आनंद झरा असे दिले असावे.

शिरीष चिटणीसांचे नाव सातारमध्ये कुणाला माहित नसेल असे नाही. कुणाच्याही पुस्तकाचे प्रकाशन करण्यासाठी ते तत्परतेने मदत करतात. साहित्याची जाण तर आहेच.

पती पत्नी दोघेही साहित्याशी आणि साहित्यिकांशी जोडलेले.




यातील पहिला लेख आहे इंग्रज सरकार विकलांग करण्यासाठी या लेखात देशबंधू दास, मोतीलाल नेहरू यांनी स्वराज्य पक्ष स्थापन केला, त्याची माहिती आहे. तसेच मोतीलाल नेहरू यांचे कार्याचा परिचय देणारा हा लेख आहे.

सशस्त्र स्वातंत्र्यलढ्याची सुरुवात या लेखात वासुदेव चाफेकर यांचे विषयीचा लेख आहे. तो काळ अक्षरशः समोर उभा राहतो. खूप बारकाव्यांनी हा लेख लिहिला आहे.

पुरुषार्थ गाजवणाऱ्यांचा इतिहास या लेखात काही व्यक्तींचा उल्लेख केलेला आहे ''भीती व द्वेष या विकारावर मात केलेली व्यक्ती म्हणजे पंडित नेहरू'' असे चर्चिल स्वतः त्यांच्याविषयी सांगतात. चर्चिल यांच्या विषयीच्या रोमहर्षक आठवणी या लेखात आहेत. ज्या इतरांना माहिती असण्याची सुतराम शक्यता नाही.

वि.द.घाटे यांच्या आत्मचरित्रातील सातारा मधील आठवणी विषयी हा लेख आहे धनजीशहा कपूर यांचे घरातील लग्नानिमित्त संगीत जलसा आयोजित केला होता व त्या सर्व आठवणींचा इतिहास या लेखात आहे. विशेषत: माधवराव पटवर्धन यांचे विषयीच्या.

ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणारे कोकणी भाषेतील साहित्यिक दामोदर मावशी यांचे विषयीची बरीच माहिती भाषा जपू या या लेखात मिळते.आधी भाषा मग साहित्य .हा त्यांचा कानमंत्र उपयुक्त वाटतो.

ध्येयाप्रत नेणारी शिष्यवृत्ती १९९९ शिबुलाल यांनी पेपरला जाहिरात दिली होती. ९० पेक्षा जास्त गुण असणाऱ्यांना शिष्यवृत्ती मिळेल अशी. आणि या शिष्यवृत्तीसाठी अदिती सावंतची निवड झाली होती आणि ही विद्यार्थिनी लोक मंगल हायस्कूलची. घरची परिस्थिती पाहून शिष्यवृत्ती नंतर पूजा सावंतला ही मिळाली होती. या शिष्यवृत्तीचा उपयोग त्यांना त्यांच्या ध्येयापर्यंत पोहोचवण्यासाठी झाला.

महात्मा गांधींचे गुरु गोपाळ कृष्ण गोखले यांच्या विषयीचा हा लेख महात्मा गांधींना त्यांचे वैयक्तिक मार्गदर्शन असायचे. गोपाळ कृष्ण गोखले म्हणजे फिरते ग्रंथालय. गोखले इन्स्टिट्यूट ऑफ इकॉनॉमिक्स ची स्थापना पुण्यात झाली होती. गोखलेंविषयीचा हा लेख माहितीप्रद छान झाला आहे.

**(क्रमशः)**




# मृत्यू हा अंत नव्हे.... व्यक्तिमत्व अमर असावे

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

मृत्यू आणि व्यक्तिमत्त्व :

यांचा संबंध आध्यात्मिक, मनोवैज्ञानिक आणि पौराणिक दृष्टिकोनातून अत्यंत सखोल मानला जातो. मृत्यू म्हणजे केवळ शरीर सोडणे नसून , एक दीर्घ प्रवास किंवा परिवर्तन मानले जाते, ज्यामध्ये व्यक्तीचे आयुष्यभराचे कर्म आणि व्यक्तिमत्त्व महत्त्वाची भूमिका बजावतात.या विषयातील मुख्य पैलू खालीलप्रमाणे आहेत:

आध्यात्मिक दृष्टिकोन : (आत्म्याची अमरता): हिंदू धर्मासह अनेक आध्यात्मिक परंपरांनुसार, आत्मा अमर आहे. शरीर नश्वर आहे आणि मृत्यू म्हणजे आत्म्याने जुने वस्त्र बदलून नवीन शरीर धारण करणे होय.

कर्म आणि मृत्यूनंतरचा प्रवास: व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व आणि आयुष्यभरातील कर्म हे ठरवतात की मृत्यूनंतर आत्म्याला काय गती मिळेल. अंतिम क्षणी मन शांत आणि इच्छामुक्त असेल तर मोक्ष मिळतो, अन्यथा आत्मा मोह-मायेत अडकतो. अशा धार्मिक पौराणिक संकल्पना आहेत.

मृत्यूचे व्यक्तिमत्त्व : पौराणिक कथांमध्ये मृत्यूचे चित्रण ग्रिम रीपर किंवा काळाच्या रूपात केले जाते, जो आत्मा गोळा करण्यासाठी येतो.

हे एका निर्दयी पण अपरिहार्य नियमाचे प्रतीक आहे, ज्यापासून कोणीही वाचू शकत नाही.




मानसशास्त्रज्ञ गॉर्डन ऑल्पोर्टयांच्या मते:

''व्यक्तिमत्त्व म्हणजे व्यक्तीचे वैशिष्ट्यपूर्ण आचार-विचार तथा वर्तनव्यवहार निर्धारित करणाऱ्या, तिच्या मनोदैहिक संस्थांचे गतिशील संघटन होय.''

व्यक्तिमत्त्व

व्यक्तिमत्त्व म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या विचार, भावना आणि वर्तनाची अद्वितीय आणि वैशिष्ट्यपूर्ण पद्धत होय. यामध्ये व्यक्तीचे शारीरिक गुण, मानसिक क्षमता, सवयी, दृष्टिकोन आणि सामाजिक वर्तन यांचा समावेश होतो. वरील संपूर्ण विश्लेषणावरून अशा एका निर्णयापर्यंत यायला हरकत नाही की मृत्यू अटळ आहे. परंतु जगलेले जीवन जरी संपुष्टात आलेले असले तरी ते कसे जगले आहे हे मात्र नक्कीच शिल्लक उरते तेच त्याचे व्यक्तिमत्व. सदेहरुपी मनुष्य पृथ्वीवरून नाहीसा झाला,परत दिसला नाही किंवा त्याला मृत्यू आला तरी मात्र त्याच्या व्यक्तिमत्त्वाची चर्चा शिल्लक राहते ती केवळ त्याच्या जीवन जगण्यातील आदर्शांवरूनच.

म्हणूनच या ठिकाणी निर्णय स्वरूपात असं म्हणता येऊ शकतं की मृत्यू हा खरोखरच अंत नाही तर व्यक्तिमत्त्वाच्या स्वरूपात व्यक्ती अमर राहतो.

# माझ्या कल्पनेच्या भराऱ्या


**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)




नुकतंच आम्ही एका ट्रीपला जाऊन आलो. मस्त थंड हवेचं ठिकाण होतं. जाऊ द्या ना, तुमची उत्सुकता फार ताणत नाही, नाव सांगून टाकतो. तर आमची नैनिताल ट्रीप होती. पण आमची राहण्याची व्यवस्था नैनितालपासून थोडं दूर असलेल्या भीमताल या ठिकाणी करण्यात आली होती. तिथलं वातावरण पाहून तर असं वाटलं की स्वर्ग स्वर्ग म्हणतात तो अजून काय वेगळा असू शकेल ? समोर सुंदर तळं ! त्याच्यापाठीमागे हिमालयाची शिखरं. आजूबाजूला दाट झाडी. सगळं अगदी चित्रात असल्यासारखं वातावरण. सूर्योदय आणि सूर्यास्ताची तिथली शोभा काय वर्णावी !

ज्या हॉटेलमध्ये थांबलो होतो, त्याच्यासमोरच हे सगळं निसर्गरम्य वातावरण होते. सकाळी नाश्त्याला विविध गरमागरम पदार्थांची रेलचेल. दुपारी आणि रात्री रसना तृप्त करील असं जेवण. माणसाला आणखी काय हवं असतं ? असं वाटलं आता कशाला पुन्हा आपल्या शहराच्या गडबडीच्या, गोंधळाच्या आणि प्रदूषित वातावरणात जायचं ? बस, इथेच राहावं. महिन्याचे किंवा वर्षाचे काय जे पैसे लागतील ते लागतील. एकदा वाटलं की हॉटेलच्या मॅनेजरला विचारावं, ''महिनाभराचे काय पॅकेज द्याल मला इथे राहण्याचे ?'' पण अचानक खिशाला हात लावला आणि लक्षात आले की, बँक बॅलन्स आणि भीमतालचे बिल यात जमीन-अस्मानाचा फरक आहे ! या हिमालयाच्या शिखरांकडे पाहत राहणे फुकट आहे, पण तिथल्या बेडवर राहणे महागात पडेल. हॉटेलच्या बिलाचा दणका भीमाच्या गदेसारखा पाठीवर बसेल हे ओळखून मी मन आवरले. सगळे निघाले, मग मलाही त्यांच्याबरोबर निघावंच लागलं.




असं कधीही माझ्या मनात काही येतं. तरी मी माझ्या मनातील दोन-तीन गोष्टीच फक्त तुम्हाला सांगितल्या आहेत. अहो, प्रत्यक्षात नाही जमलं तरी कल्पना करायला काय हरकत आहे ?

# गदर चळवळीचे एक प्रमुख नेते-भाई भागसिंह

**ज्योतिर्मय साहित्य**

कोमगाटा मारु जहाजाचा प्रवास ४ एप्रिल १९१४ रोजी हाँगकाँग बंदरावरु चालू झाला. या जहाजावर ३५१ शीख व २१ पंजाबी मुसलमान होते. आशियातील मजुरांचे अमेरिकेत येणे थांबविण्यासाठी एशियाटिक इमिग्रेशन अॅक्ट तयार करून १९०९ साली अमेरिकन सरकारने हिंदी मजुरांच्या हृदयावर आघात केला. याविरुद्ध अमेरिकेतील शीख व हिंदी समुदायाने आंदोलन चालू केले कारण त्यामुळे ब्रिटिश भारतातील नागरीकांना अमेरिकेत येण्यात अडचणी निर्माण झाल्या. १९१० च्या सुमारास कॅनेडियन सरकारने इमिग्रेशन अॅक्ट करून तो ९ मे १९१० रोजी पास केला. या कायद्याप्रमाणे ''जी व्यक्ती आपल्या देशातून कॅनडाचे तिकीट घेऊन मध्यंतरी जहाज न बदलता कॅनडात येईल व जी व्यक्ती याप्रमाणेच कॅनडातून स्वदेशात परत जाईल तिलाच केवळ कॅनडाच्या किनाऱ्यावर उतरता येईल तसेच आशिया खंडातून येणाऱ्या प्रत्येक प्रवाशाजवळ कॅनडाच्या किनाऱ्यावर उतरताना कमीतकमी २०० डॉलर्स तरी असले पाहिजेत असा नियम केला गेला.'' या कायद्याने खरी कुचंबणा ब्रिटिश भारतातील हिंदी लोकांचीच झाली. कारण जपान, चायना लोकांना त्यांच्या त्यांच्या राष्ट्रांची सरळ कॅनडाला जाणारी स्वतंत्र जहाजे होती. पण कलकत्ता ते कॅनडा,अमेरिका असे थेट जाणारे एकही जहाज नव्हते. लोकमान्य टिळक यांचे सहकारी पं. काशीराम अमेरिकेतून त्याकाळात भारताच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी चळवळ उभी करीत होते. या कायद्यामुळे अमेरिका-कॅनडा या ठिकाणी स्वातंत्र्यलढ्याला बळ मिळाले आणि सहस्त्रावधी लोक या चळवळीत सामील होऊन गदर चळवळ भारतीय स्वातंत्र्यलढ्यासाठी आणि इमिग्रेशन कायद्याविरुद्ध उभी राहिली. याला उत्तर म्हणूनच क्रांतीनेते बाबा गुरदित सिंग यांनी गुरुनानक नेव्हिगेशन कंपनी काढून व कलकत्ता ते कॅनडा सरळ जाण्याची योजना आखून एका जपानी कंपनीकडून कोमागाटा मारू नावाचे जहाज भाड्याने घेतले. हे जहाज २१ मे १९१४ रोजी व्हिक्टोरिया (कॅनडा) व २२ मे १९१४ रोजी व्हँकोव्हर येथे पोहोचले. या जहाजाला कॅनडा येथे किनाऱ्यावर येण्यास प्रतिबंध करण्यात आला. या जहाजावर गोळीबार करण्यात आला. गदर चळवळीच्या सहभागामुळे या जहाजाला भरपाई देऊन ते परत मायदेशी २३ जुलैला (भारतात) पाठविण्यात आले.

कोमागाटा मारु जहाजाच्या या करूण कथेचा ब्रिटिश भारत व भारताबाहेरच्या राष्ट्रातील भारतीयांवर विलक्षण परिणाम होऊन गदर चळवळीला जादा बळ मिळत हजारो कॅनडातील भारतीय गदर चळवळीत सामील झाले. कॅनडामध्ये असणाऱ्या गदर पक्षाच्या नेत्यांनी त्याविरुद्ध जोराचे आंदोलन सुरू केले. हे




आंदोलन चिरडण्यासाठी इमिग्रेशन विभागाचा मुख्याधिकारी हॉपकिन्सन याने आंदोलकांचा अमानुष छळ चालू केला. व्हॅन्कुव्हर येथील गुरुद्वारात ग्रंथपठण चालू असताना आणि क्रांतीनेते सरदार भाई भागसिंह जे गदर चळवळीचे कॅनडातील भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील एक प्रमुख नेते होते तसेच व्हॅन्कुव्हरच्या पहिल्या गुरुव्दाराचे (खालसा दीवान सोसायटी) अध्यक्ष होते ते गुरुव्दारात पाठ म्हणत असताना त्यांच्यावर हॉपकिन्सन यांचा बेलासिंग नावाच्या हस्तकाने गोळ्या झाडल्या. भाई भागसिंह खाली कोसळत असतानाच त्यांना वाचविण्यासाठी भाई वतनसिंह हेही मध्ये आल्यावर त्यांनाही गोळ्या झाडून मारण्यात आले. बरेच शीख समुदायातील गदर चळवळीतील क्रांतीकारक जखमी झाले. कोर्टखटला चालू झाल्यानंतर ''इमिग्रेशन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या आज्ञेनुसार त्यांचा नोकर म्हणून, मी हे कृत्य केले'' असे उघडपणे बेलसिंग याने म्हणताच त्याला कॅनेडियन कोर्टाने सोडून दिले. संतप्त क्रांतीकारकांनी हा अन्याय सहन केला नाही. भर कोर्टात गदर क्रांतीकारक मेवासिंह यांनी आदेश देणाऱ्या इमिग्रेशन अधिकारी हॉपकिन्सनला गोळी मारून ठार करून भाई भागसिंह यांच्या शहीद झाल्याचा बदला घेतला. गदर क्रांतीकारक मेवासिंह यांना फाशी देण्यात आली. क्रांतीकारक मेवासिंह यांची अंत्ययात्रा इतकी मोठी निघाली कि, ती कित्येक दिवस कॅनडा देशात चर्चेचा विषय होऊन राहिली होती. भाई भागसिंह यांची हत्या गदर चळवळीतील महत्वाची घटना मानली जाते. उत्तर अमेरिका, पंजाब आणि परदेशी भारतीय समुदाय यांच्या इतिहासात या घटनेला विशेष महत्व आहे. त्यावेळच्या बंगाळ प्रांतात पंजाब विभागात भाई भागसिंह यांच्या हत्येने स्वातंत्र्य लढ्याला बळ मिळाले. या शहादतीव्दारे गदर चळवळीला प्रेरक अधिष्ठान मिळाले. आजही भाई भागसिंह यांची स्मृती ही जागतिक, आंतरराष्ट्रीय आणि क्रांतीकारी स्वातंत्र्यसंघर्षाची आठवण करून देते.




भाई भागसिंह हे व्हॅन्कुव्हर गुरुव्दाराच्या व्यवस्थापनात सक्रीय होते आणि भारतीय समुदायात त्यांना सन्मान होता. ते गुरु ग्रंथ साहिबाच्या समोर उपस्थित असताना हल्ला झाला ही बाब अधिक वेदनादायक होती. एका धार्मिक आणि शांत स्थळी एका गदर क्रांतीकारक नेत्याची झालेली हत्या यामुळे गदर चळवळ मोठ्या प्रमाणात फोफावली. बेलासिंह हा कॅनडातील भारतीय समुदायातील घडामोडींशी संबधित, ब्रिटिश इमिग्रेशन अधिकाऱ्यांशी संपर्कात असलेला ब्रिटिशांचा हस्तक म्हणून ओळखला जातो. विलिअम हॉपकिन्सन च्या हितसंबंधाशी बेलासिंह जोडलेला असल्याने त्याची भूमिका भारतीय समाजात संशयास्पद आणि घातक मानली गेली. हा गोळीबाराचा बेलासिंह याने केलेला हल्ला गदर कार्यकर्त्यांचा वाढता प्रभाव रोखण्यासाठी केला गेला होता. हल्ल्यानंतर बेलासिंह याच्यावर खटला चालून त्याची निर्दोष सूटका झाल्याने भारतीय समाजात तीव्र संताप उसळला. या निकालाने वसाहतवादी न्यायव्यवस्थेवरील अविश्वास अधिक बळावला. भारतीय स्थलांतरिताना असे लक्षात आले कि, न्याय हा सामान्य लोकांसाठी नसून सत्ताधा-यांच्या हातातले साधन आहे. गुरुव्दारात गुरुग्रंथ साहिबाचे पठन चालू असताना धार्मिक स्थळी झालेल्या गोळीबाराने कॅनडामधील भारतीय समाज याविरोधात मनाने एकत्र आला आणि गदर चळवळीशी जोडला गेला. हा हल्ला केवळ हिंसकच नव्हे तर प्रतीकात्मकदृष्ट्याही धक्कादायक होता. या प्रसंगामे व्हॅन्कुव्हरमधील शीख समुदायाला जबर मानसिक धक्का बसला. गुरुव्दार हे सुरक्षीत स्थान मानले जात असताना तेच असुरक्षित ठरले. त्यामुळे शीख समुदायात संताप, भीती आणि प्रतिकाराची भावना एकाच वेळी निर्माण झाली.

**(क्रमशः)**

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559